॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle


**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

जळगाव दि. 20 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील विविध महाविद्यालये / परिसंस्थेतील व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातंर्गत प्रवेशित विद्यार्थी पैशांअभावी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या एकलव्य विद्याधन कर्ज योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी 5 सप्टेंबरपर्यंत संबंधित महाविद्यालय / विभागांकडे अर्ज सादर करावयाचे आहेत.

पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातंर्गत शिक्षण घेणाऱ्या गरीब, हुशार,होतकरु व गरजू विद्यार्थ्यांसाठी ही योजना सन 2004-05 पासून विद्यापीठाने सुरु केलेली आहे. या योजनेद्वारे विद्यापीठाने निश्चित केलेल्या दहा राष्ट्रीयकृत व दोन शेडयूल बँकांच्या विविध शाखेद्वारे विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी एकूण शैक्षणिक खर्चाच्या 70% रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येते. या कर्जासाठी व्याजाचा दर कमाल द.सा.द.शे. 11% किवा त्यापेक्षा कमी दराचे व्यास असल्यास सदरच्या व्याजाच्या खर्चाची प्रतिपूर्ती अभ्यासक्रमाच्या कालावधीपर्यंत विद्यापीठाद्वारे प्रत्येक तिमाहीस संबंधित बँकेने मागणी केल्यावर केली जाणार आहे. 11% पेक्षा जास्त व्याजदर बँकेने आकारल्यास जास्तीच्या व्याज दरानुसार व्याजाची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांनी परस्पर बँकेत जमा करणे आवश्यक आहे.

महाविद्यालये व विद्यापीठ विभागांनी विद्यार्थ्यांकडून आलेल्या अर्जाची प्राथमिक स्वरुपात पडताळणी करुन एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या कमाल 2 टक्के विद्यार्थ्यांचे अर्ज शिफारसीसह संचालक, विद्यार्थी विकास विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडे 18 सप्टेंबर पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्या आधी विद्यार्थ्यांनी 5 सप्टेंबर पर्यंत महाविद्यालये/विभाग यांच्याकडे विहित नमून्यातील अर्ज सादर करावयाचे आहेत.या योजनेसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे आणि योजनेची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २० जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी